# अधिसूचना

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १४ मार्च, २०१७

प्राणी क्लेष प्रतिबंधक (प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी स्थापना व नियमन) नियम, २००१

क्र. पविआ-२०१४/प्र.क्र.४१४/पदुम-३,- ज्याअर्थी, प्राणी क्लेष प्रतिबंधक अधिनियम, १९६० ची (१९६० चा ५९) महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी स्थापन करण्याची आवश्यकता योग्य असल्याची शासनाची धारणा झालेली आहे;

आता, त्याअर्थी या अनुरोधाने प्राणी क्लेष प्रतिबंधक (प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी स्थापना व नियमन) नियम, २००१ (यापुढे याचा उल्लेख "सदरचे नियम" म्हणून करण्यात येईल), मधील नियम ३ च्या उप-नियम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, प्राणी क्लेष प्रतिबंधक अधिनियम, १९६० च्या कलम ४ अन्वये स्थापन केलेल्या भारताचे प्राणी कल्याण मंडळाच्या सहमतीने, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी स्थापन करत आहे. तसेच, सदरच्या नियम ३ मधील उप-नियम (२) मधील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटीचे खालील प्रमाणे रचना असलेल्या व्यवस्थापकीय समितीची नियुक्ती करत आहे.

## (अ) पदसिध्द सदस्य

| | |
|---|---|
| (१) जिल्हाधिकारी | :- अध्यक्ष |
| (२) जिल्हा पोलीस अधिक्षक | :- सदस्य |
| (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | :- सदस्य |
| (४) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयाकरिता.- पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) | :- सदस्य |
| (५) आयुक्त महानगरपालिका यांनी नामनिर्देशित केलेला उपआयुक्तांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (फक्त महानगरपालिका असलेल्या ठिकाणी) | :- सदस्य |
| (६) प्रादेशिक परिवहन अधिकारी | :- सदस्य |
| (७) जिल्हा वन अधिकारी | :- सदस्य |
| (८) जिल्हा शिक्षण अधिकारी | :- सदस्य |
| (९) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांकरिता - शिक्षण उपसंचालक, (शालेय शिक्षण), मुंबई विभाग, मुंबई | :- सदस्य |
| (१०) जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी | -: सदस्य |
| (११) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त | -: सदस्य सचिव |

**(ब) सदर नियमाच्या नियम ३ (२)(i) आणि (ii) अन्वये नियुक्त करावयाचे अशासकीय सदस्य**

(१२) संबंधित जिल्हयातील गोशाळा/पांजरापोळ संस्थांपैकी एका संस्थेचा अध्यक्ष -: सदस्य

(१३) प्राणी कल्याणविषयक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेचे दोन सदस्य :- सदस्य

(१४) सर्वसाधारण समितीने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती -: सदस्य

(१५) संबंधित जिल्ह्यातील मानवहितकारक कार्य करणारे / प्राण्यांवर प्रेम करणारे / प्राणी कल्याणासाठी काम करणारे पाच ते सहा कार्यकर्ते -: सदस्य

**(क) पदसिध्द पदाधिकारी / अशासकीय सदस्य यांची नियुक्ती / कार्यकाळ**

(१) पदसिध्द अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य आणि सदस्य सचिव हे त्यांच्या मुळ पदावर कार्यरत असेपर्यंत समितीवर कार्यरत राहतील.

(२) अनुक्रमांक १२ ते १५ येथे नमूद केलेल्या अशासकीय सदस्यांची नियुक्ती तीन वर्ष कालावधी करीता राहील:

परंतु, अनुक्रमांक १२ ते १५ येथील कोणत्याही सदस्याला समितीमधून काढून टाकण्याचे अधिकार शासनास राहतील.

(३) अनुक्रमांक १२ ते १५ येथील सदस्य नियुक्तीबाबत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत प्राप्त झालेल्या शिफारशी विचारात घेऊन राज्य शासनाकडून नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात येईल.

(४) सदरची अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून या संदर्भात सर्व जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या सोसायट्यांचे अस्तित्व संपूष्टात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(आ. लिं. जऱ्हाड)
शासनाचे सचिव

***NOTIFICATION***

Agriculture, Animal Husbandry,
Dairy Development and Fisheries
Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya,
Mumbai 400 032.
Dated the 14th March 2017.

Prevention of Cruelty to Animals (Establishment and Regulation of Societies for Prevention of Cruelty to Animals) Rules, 2001.

No.PAVIA-2014/C.R.414/ADF-3, Whereas, the Government of Maharashtra is of the opinion that it is expedient to establish a Society for Prevention of Cruelty to Animals in each District in the State of Maharashtra and to appoint Managing Committee of such Society for implementation of the provisions of the Prevention of Cruelty to Animals Act, 1960 (59 of 1960);

Now, therefore, in pursuance of the powers conferred by sub-rule (*1*) of the rule 3 of the Prevention of Cruelty to Animals (Establishment and Regulation of Societies for Prevention of Cruelty to Animals) Rules, 2001 (hereinafter referred to as "the said rules"), with the concurrence of the Animal Welfare Board of India, established under section 4 of the Prevention of Cruelty to Animals Act, 1960, the Government of Maharashtra hereby establishes the Society for Prevention of Cruelty to Animals in each District in the State of Maharashtra and in pursuance of the powers conferred by sub-rule (*2*) of rule 3 of the said rules, the Government of Maharashtra hereby appoints the Managing Committee of the aforesaid Society for each district in the State of Maharashtra with the following composition, namely:-

*(A) Ex-officio Members.-*

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Collector | : | Chairperson; |
| 2. | Superintendent of Police | : | Member; |
| 3. | Chief Executive Officer, Zilla Parishad | : | Member; |
| 4. | For the District of Mumbai City and | : | Member; |

| | | | |
|---|---|---|---|
| | Mumbai Suburban, - Deputy Commissioner of Police, (Head Quarter) | | |
| 5. | The officer nominated by the Commissioner of Municipal Corporation who is not below the rank the Deputy Commissioner (In case of Municipal Corporation only) | : | Member; |
| 6. | Regional Transport Officer | : | Member; |
| 7. | District Forest Officer | : | Member; |
| 8. | District Education Officer | : | Member; |
| 9. | For the District of Mumbai City and Mumbai Suburban,- Deputy Director (School Education) Mumbai Division, Mumbai. | : | Member; |
| 10. | District Information and Publicity Relation Officer | : | Member; |
| 11. | District Deputy Commissioner of Animal Husbandry | : | Member-Secretary; |

*(B) Non-Government Members to be appointed under rule 3(2) (i) and (ii) of the said Rules.-*

| | | | |
|---|---|---|---|
| 12. | One Chairman of *Goshalas* / *Panjarapols* in the concerned District | : | Member; |
| 13. | Two Members of the Charitable Society who works for welfare of animals | : | Member; |
| 14. | Two persons nominated by the General body of the Committee | : | Member; |
| 15. | Five to six persons who are humanitarian workers, animal lovers or animal welfare activists in the concerned District | : | Member. |

*(C) Tenure of ex-officio and non-Government Members.-*

(*i*) The ex-*officio* Chairperson, Members and Member-Secretary shall remain on the Managing Committee of the concerned District until they are working on their original posts.

(*ii*) The members at serial Nos. 12 to 15 shall be appointed for a period of three years:

Provided that, the Government may remove any member mentioned at serial Nos. 12 to 15.

(*iii*) The Members mentioned at Serial Nos. 12 to 15 shall be

nominated by the State Government on the recommendation of the concerned District Collector.

(*iv*) All the working societies at district level functioning in the District shall cease to exist from the date of issue of this notification.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(A.L. Jarhad)
Secretary to Government.